नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक २२/०६/२०२५ (रविवार)**

## पोलीस मुख्यालय, नागपुर ग्रामीण जिल्हा येथे साजरा करण्यात आला आंतरराष्ट्रीय योगा दिवस.

दिनांक २१/०६/२०२५ रोजी पोलीस मुख्यालय, नागपुर ग्रमीण जिल्हा, येथे ११ वा आंतरराष्ट्रीय योगा दिवस साजरा करण्यात आला. त्यावेळी पोलीस मुख्यालय येथील राखीव पोलीस निरीक्षक श्री संजय क्षीरसागर यांच्यासह पोलीस मुख्यालयाचे अधिकारी व १२० पोलीस अंमलदार हजर होते.




vivo T1
Jun 21, 2025, 07:09


vivo T1
Jun 21, 2025, 07:08

## अवैधरित्या रेतीची चोरटी वाहतुक करणाऱ्या आरोपीतांविरूध्द गुन्हा नोंद
## उमरेड पोलीसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन उमरेड** :— दिनांक २२/०६/२०२५ रोजी उमरेड पोलीसांना गुप्त बातमीदारांकडुन खात्रीशीर माहीती मिळाली की, भिसी कडुन उमरेड कडे अवैधरित्या विनापरवाना रेतीची चोरटी वाहतुक होत आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे पोलीसांनी **मांगरूळ फाटा** येथे नाकाबंदी केली असता एक संशयीत वाहन टाटा कंपनीचा १२ चाकी टीप्पर क्रमांक एम. एच. २७ बी.एक्स. ३३४३ हे थांबवुन वाहनाची पाहणी केली असता त्यामध्ये रेती आढळुन आली. वाहन चालक आरोपी नामे **आशीष गजानंन जाधव, वय २७ वर्ष, रा. विवेकानंद नगर ,कन्हान, ता. कामठी** याला परवान्याबाबत विचारपुस केली असता त्याने कोणताही परवाना नसल्याबाबत सांगितले. पोलीसांनी पंचासमक्ष वाहनामधुन **१) ५ ब्रास रेती आणि २) क्रमांक एम. एच. २७ बी.एक्स. ३३४३ असा एकुण २५,२५,०००/— रूपयाचा मुददेमाल जप्त केला आहे.**

**वाहन चालक आरोपी नामे आशीष गजानंन जाधव, वय २७ वर्ष, रा. विवेकानंद नगर ,कन्हान, ता. कामठी याच्या विरूध्द पोस्टे उमरेड येथे कलम ३०३(२) भा.न्या.सं सहकलम ४८(७), ४८(८) महाराष्ट्र जमीन महसूल संहिता सह कलम ४,२१ खाण खनिज अधिनियम सह कलम ३ सार्वजनिक संपत्ती नुकसान प्रतिबंध अधिनियम ,सहकलम १५ पर्यावरण संरक्षण अधिनियम अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.**

## पोलीस ठाणे उमरेड हद्दीतील गरडेपार शिवार परिसरात
## अवैधरित्या मोहाफुल गावठी दारू काढणाऱ्या आरोपी विरूध्द गुन्हा नोंद

**पोलीस स्टेशन उमरेड** :— दिनांक २२/०६/२०२५ रोजी उमरेड पोलीसांना गुप्त बातमीदारांकडुन खात्रीशीर माहीती मिळाली की, मौजा गरडेपार येथे झाडीझुडपामध्ये एक महीला हातभट्टीची मोहाफुल गावठी दारु काढल्या जात आहे. पोलीसांनी सदर ठिकाणी जावुन पाहणी केली असता , महीला आरोपी मोहाफुल रसायन सडवा बाळगुन मोहाफुल गावठी दारूची भट्टी

लावुन दारू काढतांना मिळुन आली. पोलीसांनी घटनास्थळावरून **१). दोन १५ लिटर प्लॅस्टीक डबक्यामध्ये ३० लीटर मोहाफुल गावठी दारू २). दोन प्लॅटीक ड्रम ३).मोहाफुल रसायन सडवा २०० किलो, ४). भटटी वर वापरण्यात .आलेले एक जर्मन घमेले व दारू गाळण्याचे इतर साहीत्य असा एकुण १२,४००/— रुपयांचा मुद्देमाल मौक्यावर पंचनामा कार्यवाही करून नष्ट करण्यात आला.**

नमुद आरोपी विरुद्ध पोलीस स्टेशन उमरेड येथे कलम ६५( फ क, ई) महाराष्ट्र दारूबंदी अधिनियमान्वये गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

**मा. पोलीस अधिक्षक**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**
**यांच्या मान्यतेने**